अज़ान आणि नमाज़ म्हणजे काय?

नसीम गाजी फलाही



इस्लामिक मराठी पब्लिकेशन्स ट्रस्ट

अज़ान व नमाज़ म्हणजे काय?

* लेखक *

नसीम ग़ाज़ी

* भाषांतर *

हुसेनखान चांदखान पठाण

* प्रकाशक *

इस्लामिक मराठी पब्लिकेशन्स ट्रस्ट

४, हामिद बिल्डिंग, ९६, हाफीज़ अली बहादुर मार्ग,

मोमीनपुरा, मुंबई - ४०० ०११.

फोन : २३०१८३८७ / २३०८२८२०

फॅक्स : २३०५२००२ / मोबाईल : ९२२४५ ९९९१०

वेबसाईट : islamicmarathipublications.com

AZAAN AUR NAMAZ KYA HAI (Urdu)

AZAAN VA NAMAZ MHANJE KAAY (Marathi)

IMP Series No. :- **70**

Written by :- **Nasim Gazi Falahi**

Translated by :- **Hussainkhan Chandkhan Pathan**

Copies :- **2000**

Edition :- **1st (Dec. 2008)**
2nd (April 2010)

IMPT

Published by :-

ISLAMIC MARATHI PUBLICATIONS TRUST

4, Hamid Bldg., 96, Hafiz A. B. Marg,
Mominpura, MUMBAI - 400 011.
Tel. : 2301 83 87, 2308 28 20, Fax : 2305 2002
Mobile : 92245 99910

ISBN-81-87634-69 HADIYA (MULYA) : Rs. 8/-

"अल्लाह, असीम दयावंत व कृपावंतच्या नावाने"

दोन शब्द

अज़ान आणि नमाज़संबंधी लोकांना माहिती नसल्यामुळे अनेक गैरसमज निर्माण होत असल्याचे आढळून आले आहे. इस्लामसंबंधीच्या अचूक माहिती अभावी इस्लामच्या या पवित्र आणि कल्याणकारी उपासनापद्धतीच्या बाबतीत बेधडक अयोग्य टीका केली जाते आणि त्याबाबतीत खरी माहिती मिळविण्याचे प्रयत्नसुद्धा केले जात नाहीत. अशावेळी ही बाब अधिक दु:खदायक होते. समाजातील अनेक थरांतील लोक हीच नीति स्वीकारतात, त्यात शिक्षितही आहेत आणि सामान्यजन सुद्धा आहेत.

अज़ानमध्ये 'अल्लाहु अकबर' म्हणून अकबर बादशहाचा धावा केला जातो असे बरेच लोक समजतात, ते अज्ञानामुळे. असेच कबिरदाससारख्या महापुरुषानेसुद्धा अज़ानसंबंधी अज्ञान प्रकट केले आहे. त्यांचा एक दोहा पहा :-

कंकर पत्थर जोर के मस्जिद लिया बनाय।

तापे मुल्ला बांग दे, क्या बहरा हुआ खुदाय।।

बांग (म्हणजेच अज़ान) देणाऱ्याला मुल्ला म्हणत नाहीत. हे पहिले अज्ञान बांग/ अज़ान देणाऱ्याला बांगी किंवा मुअज्जीन म्हणतात. बांग देणाऱ्याला शांतपणे बांग द्यावी लागते. तो तापलेला (तापे) नसतो हे वास्तव आहे. मुल्ला तापलेल्या अवस्थेत बांग देतो म्हणजे काय परमेश्वर बहिरा झाला आहे काय? असा प्रश्न कबिरदासांनी उपस्थित केला आहे. वास्तविक बांग किंवा अज़ान ही परमेश्वरासाठी नसतेच. नमाजाची वेळ झाल्याने लोकांना नमाजला बोलाविण्यासाठी सूचक बोल अज़ानमध्ये असतात. ते बोल अल्लाह (खुदाच्या) च्या भक्तासाठी असतात. खुदासाठी मुळीच नसतात. त्यामुळे खुदा बहिरा असण्या नसण्याचा प्रश्न येथे उपस्थित होत नाही. संत कबिरदासांचे अज्ञान इतके असेल तर सामान्य जनांचे काय? 'अल्लाहु अकबर' मधील 'अकबर' या अरबी शब्दाचा अर्थ 'सर्वश्रेष्ठ' असा असून तो शब्द अल्लाहचे विशेषण आहे. या शब्दाचा अकबर बादशहाशी काडीमात्र संबंध नाही.

एकमेकांच्या धर्माबद्दल खरी माहिती नसणे यात आजच्या अनेक सामाजिक

समस्यांचे मूळ आहे. अन्य धर्माबद्दल घोर अज्ञान असूनसुद्धा त्या धर्मासंबंधीची ठोस मते व्यक्त करणे ही एक आजची फॅशन झाली आहे. या युगात माहिती प्राप्त करण्यासाठी अनेक साधने आणि यंत्रणा हाताशी असूनसुद्धा सुशिक्षित आणि सुसंस्कृत समाजसुद्धा काही मूलभूत गोष्टींबाबत अंधारात चाचपडत असल्याचे आढळून येते.

माहितीचा अभाव आणि दुसऱ्या बद्दल कमालीचा द्वेष यामुळे मनुष्य वास्तविक स्वत:च्या कल्याणासाठी असलेल्या बाबींचा शत्रू बनतो. असेच काहीसे इस्लाम आणि त्याच्या शिकवणुकीबाबत झाले आहे आणि होत आहे.

या छोट्याशा पुस्तकात अज़ान, नमाजाचे महत्त्व आणि नमाजचा मूळ अर्थ विषद करण्यात आला आहे, जेणेकरून त्यांचे खरे स्वरुप सामान्य लोकांसमोर यावे आणि त्याबद्दलचे गैरसमज दूर व्हावेत.

नमाजमुळे लोकांना मन:शांती आणि चक्षुशांती लाभेल अशी केवळ आशाच नाही तर आमचा दृढ विश्वास आहे.

– नसीम ग़ाज़ी

नमाज़चे माहात्म्य

आम्हा मनुष्यास आणि संपूर्ण जगातील सजीव निर्जिवास सर्वशक्तिमान अल्लाहने निर्माण केले आहे. सजीवांना जीवन जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व वस्तू त्याने पुरविल्या आहेत. जीवन आणि मृत्यू त्याच्याच हातात आहे. जीवन-मरणाचा मालक तोच आहे. तोच पालनकर्ता आहे, तोच अन्नदाता आहे. आपल्या विनवण्या आणि प्रार्थना ऐकणारा, संकटकाळी मदत करणारा तोच आहे. आपल्याला लाभ किंवा हानी पोचविण्याची क्षमता, वास्तविक त्याच्याशिवाय कुणामध्ये नाही. जगामध्ये जे काही आहे खऱ्या अर्थाने त्याचा मालक अल्लाहच आहे. खरा शासक तोच आहे. जगाचा हा कारखाना त्यानेच चालविल्यामुळे चालला आहे. त्या सर्वशक्तिमान अल्लाहचा कोणीही भागीदार नाही. त्याच्या अस्तित्वात, त्याच्या गुणात आणि त्याच्या अधिकारात अन्य कोणीही भागीदार नाही. मृत्यूनंतर आपल्या जीवनातील कर्माचा तो हिशोब करील आणि कर्मानुसार मोबदला देईल. आम्हा मानवाच्या मार्गदर्शनासाठी अल्लाहचे संदेशवाहक आणि प्रेषितांना जगात पाठिविले. या प्रेषितांनी अल्लाहच्या आदेशानुसार जीवन जगण्याच्या पद्धती सांगितल्या. सर्व प्रेषितांची शिकवणूक एकच होती. अल्लाहचे आज्ञापालन आणि त्याच्याप्रती आत्मसमर्पण. आपल्या सर्वांचा पालनकर्ता अल्लाहने प्रेषित मुहम्मद (स) यांना आपला अंतिम संदेशवाहक म्हणून पाठविले आणि त्यांच्यामार्फत कुरआन रूपी ग्रंथ पाठवून सर्व मानवांच्या संपूर्ण मार्गदर्शनाची व्यवस्था केली. याच मार्गदर्शनाचे नाव इस्लाम आहे. कोणत्याही विशिष्ट व्यक्तीच्या, देशाच्या किंवा कोणत्याही वस्तूच्या नावावर ठेवलेले 'इस्लाम' हे नाव नाही. ते विशिष्ठ गुणावर आधारित असलेले नाव आहे. इस्लाम शब्दाचा शब्दश: अर्थ ''आज्ञापालन आणि समर्पण'' असा आहे. इस्लाम म्हणजे वस्तुत: स्वत:ला अल्लाहप्रती समर्पित करणे आणि त्याच्या आदेशांचे स्वेच्छेने पालन करणे होय. भक्ती, उपासना आणि आज्ञापालन केवळ अल्लाहचेच केले जावे ही इस्लामची मूळ शिकवण आहे. केवळ अल्लाहलाच आराध्य केले जावे आणि त्याचीच आराधना केली जावी. इतर कोणासमोर नतमस्तक होता कामा नये आणि संपूर्ण जीवन अल्लाहची प्रेमपूर्वक भक्ती आणि त्याचे आज्ञापालन करण्यात व्यतीत करावे अशी इस्लामची शिकवणूक आहे.

अल्लाहप्रती आपली भक्ती दर्शविण्यासाठी, त्याच्या दास्यत्वाची (भक्तीची) कर्तव्ये पार पाडण्यासाठी, त्याच्या उपकाराप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी, अल्लाहच्या श्रेष्ठत्वाची आणि सत्तेची स्वीकृती दर्शविण्यासाठी आणि या सर्व बाबी सतत स्मरणात राहण्यासाठी इस्लामने ज्या उपासनापद्धती निर्धारित केल्या आहेत, त्या सर्वांत महत्त्वपूर्ण उपासनापद्धत नमाज आहे. नमाजचे महत्त्व आणि तिच्या आवश्यकतेचा उल्लेख, कुरआन या अल्लाहकडून अवतरीत झालेल्या ग्रंथात आणि प्रेषित मुहम्मद (स) यांच्या हदीसमध्ये खूप वेळा आला आहे. दिवसातून पाच वेळा नमाज अदा करणे इस्लामच्या प्रत्येक अनुयायांवर (स्त्री व पुरुष) बंधनकारक आहे. इस्लामच्या कोणाही अनुयायाने नमाज सोडणे (नमाज अदान करणे) अधर्म ठरविले गेले आहे. नमाजशिवाय इस्लामचा अनुयायी होण्याची कल्पनासुद्धा केली जाऊ शकत नाही ही वस्तुस्थिती आहे.

संपूर्ण अवधानाने आणि समजून उमजून नमाज अदा केली जात असेल तर नमाज माणसाचे आध्यात्मिक जीवन विकसित करतेच, शिवाय अल्लाहशी जवळीक निर्माण करते आणि त्याला अल्लाहचा आवडता दास (भक्त) बनविते. मानवाच्या या जगातील जीवनातील वाईटांचा आणि दुर्गुणांचा नायनाट करून त्याला एक जबाबदार आणि सज्जन पुरुष म्हणजे पुरुषोत्तम बनविण्याची क्षमता नमाजमध्ये आहे. वास्तविक नमाज माणसाला आपल्या निर्मात्या आणि पालनकर्त्या अल्लाहच्या इच्छेनुसार आणि आदेशानुसार संपूर्ण जीवन व्यतीत करण्यास अनुरुप बनविते. नमाजच्या एकंदरीत स्वरुपावरून हे सत्य स्पष्ट होते. नमाजच्या उद्देशाचे कथन करताना पवित्र कुरआनात अल्लाह स्पष्ट करतो :-

''नमाज अश्लील कर्मापासून आणि दुष्कृत्यापासून निश्चितच परावृत्त करते.''

(पवित्र कुरआन - २९:४५)

जे लोक वरकरणी नमाज अदा करतात, परंतु नमाजच्या आत्म्याशी आणि तिच्या अपेक्षाशी अनभिज्ञ आणि बेपर्वा असतात, त्यांच्याविषयी पवित्र कुरआनचे निवेदन आहे :-

''विनाश आहे त्या नमाज अदा करण्यासाठी जे आपल्या नमाजच्या अपेक्षाशी बेपर्वा आहेत. असे लोक फक्त दिखावा करतात आणि त्यांची परिस्थिती अशी आहे की गरजू लोकांना क्षुल्लक वस्तू देण्याससुद्धा ते टाळाटाळ करतात.''

(पवित्र कुरआन - १०७ : ४-७)

अल्लाहचे परम भक्त प्रेषित मुहम्मद (स) यांची या संदर्भात हदीस आहे -

"ज्या कुणाची नमाज त्याला / तिला अश्लील आणि दुष्कृत्यापासून परावृत्त करीत नसेल तर त्यामुळे तो/ती अल्लाहपासून अधिक दूर जाईल." (हदीस)

मानवी जीवनाला नमाजच्या अनुरूप ठेवण्याची अपेक्षा इस्लाम करतो. नमाज जीवनाचे सारांश बनावी आणि संपूर्ण मानवी जीवनाने नमाजची व्याख्या सिद्ध करावी असे इस्लामला अभिप्रेत आहे. या उद्देशाच्या परिपूर्ततेसाठी नमाजमध्ये वाचले जाणाऱ्या प्रत्येक श्लोकाचा अर्थबोध समजून घेऊन नमाज अदा केली जावी. नमाज अदा करताना माणसाने आपण प्रत्यक्ष आपल्या पालनकर्त्या अल्लाहसमोर उभे आहेत याचे निरंतर भान ठेवावे आणि अल्लाहाकडेच आपण याचना करीत आहोत याची जाणीव ठेवावी. अल्लाह आपल्याला पाहंत आहे आणि आपली प्रार्थना ऐकत आहे याचे त्याने नमाजमध्ये सतत अवधान बाळगावे. नमाज या उपासनापद्धतीपासून पूर्ण लाभान्वित होण्यासाठी माणसाने आत्मनिरीक्षण करावे आणि नमाजमध्ये जी काही वचने आपण अल्लाहला दिली आहेत ती पूर्ण करण्याचा पराकाष्ठेने प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे.

नमाज अदा करण्यासाठी मनाच्या शुद्धतेबरोबर माणसाने आपले शरीर, कपडे आणि नमाजचे ठिकाणसुद्धा स्वच्छ ठेवणे आवश्यक आहे.

अज़ान आणि नमाजमध्ये जे काही उच्चारले जाते, ते मराठी अनुवादासह पुढे प्रस्तुत करण्यात येत आहे.

अज़ान

दिवसातून पाचवेळा प्रत्येक नमाजपूर्वी अजान दिली जाते. (प्रत्येक अजान केवळ १ ते १॥ मिनिटाची असते) ओरडून ओरडून अल्लाहला अजानद्वारे पुकारण्यात येत असते, असे काही लोक अज्ञानामुळे समजतात. ही समजूत अत्यंत चूकीची आणि अज्ञानमूलक आहे. परिभाषेनुसार अजानचा अर्थ लोकांना नमाजाकरिता बोलाविणे असा आहे. अज़ान देणारी व्यक्ति म्हणजे मुअज्जिन (बांगी) चढ्या आवाजात मशिदीत सामुहिक नमाज पढण्यासाठी अल्लाहच्या साक्षीने लोकांना बोलावित असतो.

अज़ानचे बोल अदा करण्यासाठी मराठी अनुवाद

अल्लाहु अकबर।	अल्लाह सर्वश्रेष्ठ आहे।
अल्लाहु अकबर॥	अल्लाह सर्वश्रेष्ठ आहे॥
अल्लाहु अकबर।	अल्लाह सर्वश्रेष्ठ आहे।
अल्लाहु अकबर॥	अल्लाह सर्वश्रेष्ठ आहे॥

अश्‌हदु अल्‌ लाऽऽइलाह इल्लल्लाह।

अल्लाहशिवाय अन्य कोणीही उपास्य नाही याची मी ग्वाही देतो!

अश्‌हदु अल्‌ लाऽऽ इलाह इल्लल्लाह॥

अल्लाहशिवाय अन्य कोणीही उपास्य नाही याची मी ग्वाही देतो॥

अश्‌हदु अन्न मुहम्मदर्रसूलुल्लाह।

मुहम्मद (स) अल्लाहचे प्रेषित आहेत याची मी ग्वाही देतो।

अश्‌हदु अन्न मुहम्मदर्रसूलुल्लाह॥

मुहम्मद (स) अल्लाहचे प्रेषित आहेत याची मी ग्वाही देतो॥

हय्य अलस्सलाह।	-	नमाजसाठी या।
हय्य अलस्सलाह॥	-	नमाजासाठी या॥
हय्य अलल्‌ फलाह।	-	तुमच्या कल्याणासाठी या।
हय्य अलल्‌ फलाह॥	-	तुमच्या कल्याणासाठी या॥
अल्लाहु अकबर।	-	अल्लाह सर्वश्रेष्ठ आहे।
अल्लाहु अकबर॥	-	अल्लाह सर्वश्रेष्ठ आहे॥
ला इलाह इल्लल्लाह।	-	अल्लाहशिवाय अन्य कोणीही उपास्य नाही।

टीप - सूर्योदयापूर्वीच्या (फ़ज्रच्या) नमाजाकरिता दिल्या जाणाऱ्या अज़ानमध्ये खालील अधिक बोल उच्चारले जातात.

अस्सलातु ख़ैरुम्‌-मिनन्‌-नौम।	झोपेपेक्षा नमाज उत्तम आहे।
अस्सलातु ख़ैरुम्‌-मिनन्‌-नौम।	झोपेपेक्षा नमाज उत्तम आहे।

ही आहे अज़ान आणि हे आहेत अज़ानचे मंगल बोल. एका ईश्वरावर (अल्लाहवर) श्रद्धा ठेवणाऱ्या आणि प्रेषित मुहम्मद (स) यांना अल्लाहचे प्रेषित आणि संदेष्टा मानणाऱ्या सर्व लोकांना याच अज़ानद्वारे नमाजकरिता बोलावण्यात येते.

नमाजमध्ये काय पठण केले जाते?

नमांजकरिता उभे राहिल्यानंतर सर्वप्रथम ''आम्ही जगापासून अलिप्त होऊन अल्लाहसमोर नमाजसाठी उभे आहोत.'' असा मनोनिग्रह केला जातो. नमाजमध्ये जे काही पठण केले जाते ते देवनागरी लिपीतील अरबीमध्ये देऊन त्याचा मराठी अनुवाद दिला जात आहे.

उभे राहिल्यानंतर प्रथम उच्चारले जाते :-

''अल्लाहु अकबर'' अल्लाह सर्वश्रेष्ठ आहे

तद्नंतर 'सना' म्हटली जाते.

सना - ''सुब्हान कल्लाहुम्म व बिहम्दिक व तबारकस्मुक व तआला जद्दुक व लाऽऽइलाह गैरुक.''

सना (अनुवाद) - हे अल्लाह मी तुझ्या पावित्र्याचे वर्णन करतो आणि तुझी स्तुती करतो आणि तुझे नाम समृद्धीदायक आहे आणि तुझी प्रतिष्ठा श्रेष्ठतम आहे आणि तुझ्याशिवाय अन्य कोणीही उपास्य नाही.

''अऊज़ु बिल्लाहि मिनश्शैता निर्रजीम''

तिरस्कृत शैतानापासून, मी अल्लाहचे शरण घेतो.

''बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीम''

आरंभ करतो अल्लाहच्या नावाने जो सर्वाधिक कृपावंत, सर्वाधिक दयावंत आहे.

यानंतर सूरह अल्. फातिहा पठण केली जाते

बिस्मिल्लहिर्रहमानिर्रहीम

१. अल् हम्दु लिल्लाहि रब्बिल आलमीन,

२. अर्रहमा निर्रहीम,

३. मालिकि यौमिद्दीन,

४. इय्याक नअ़बुदु व इय्याक नस्तईन,

५. इहदिनस्सिरातल् मुस्तक़ीम,

६. सिरातल्लज़ीन अनअ़म्त अ़लैहिम,

७. ग़ैरिल मग़ज़ूबि अलैहिम् वलज़्ज़ाऽऽऽलीन (आमीन)

सूरह अल फातिहाचा अनुवाद :

आरंभ करतो अल्लाहच्या नावाने जो सर्वाधिक कृपावंत सर्वाधिक दयावंत आहे.

१. सर्व स्तुती अल्लाहकरिता आहे जो सर्व जगांचा पालनकर्ता आहे,

२. सर्वाधिक कृपाळू, सर्वाधिक दयाळू,

३. जो कयामतच्या दिवसाचा अधिपति आहे,

४. आम्ही फक्त तुझीच उपासना करतो आणि आम्ही फक्त तुझीच मदत मागतो,

५. आम्हाला सरळ मार्ग दाखव,

६. त्या लोकांचा मार्ग ज्यांना तू तुझ्या कृपेची देणगी दिली आहेस,

७. ना त्यांचा (मार्ग) ज्यांच्यावर तुझा प्रकोप झालेला आहे, आणि ना त्यांचा (मार्ग) जे मार्गभ्रष्ट झालेले आहेत. (तथास्तु)

सूरह अल् फातिहानंतर नमाजच्या प्रत्येक रकातमध्ये कुरआनमधील छोट्या सूरहपैकी कोणतीही एक सूरह पठण केली जाते. अशा सूरहपैकी काही सूरह खाली देण्यात येत आहेत.

सूरतुल अस्र

बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीम

१. वल अस्रि,

२. इन्नल् इन्सान लफ़ी खुस्र,

३. इल्लल्लज़ीन आमनू व अ़मिलुस्सालिहाति व तवासौ बिलहक्कि व तवासौ बिस्सब्र

अनुवाद

आरंभ करतो अल्लाहच्या नावाने जो सर्वाधिक कृपावंत, सर्वाधिक दयावंत आहे.

१. काळाची शपथ,

२. नि:संशय मानव तोट्यात आहे,

३. त्या लोकांशिवाय ज्यांनी श्रद्धा ठेवली आणि सत्कर्मे केली आणि (ज्यांनी) आपापसात एकमेकांना सत्याचा आणि संयमाचा उपदेश केला.

सूरतुन्नस्र

बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीम

१. इज़ा जाऽऽअ नस्रुल्लाहि वल् फ़त्ह,

२. व रऐतन्नास यदखुलून फ़ी दीनिल्लाहि अफ़वाजा,

३. फ़सब्बिह बिहम्दि रब्बिक वस्तग़फिरहु,

इन्नहू कान तव्वाबा

सूरतुन्नस्र अनुवाद

आरंभ करतो अल्लाहच्या नावाने जो सर्वाधिक कृपावंत सर्वाधिक दयावंत आहे.

१. जेव्हा अल्लाहची मदत यावी आणि विजय मिळावा,

२. आणि तू लोकांना समूहासमूहाने अल्लाहच्या धर्मात दाखल होताना पाहावे,

३. तू आपल्या अल्लाहचा जप करू लाग, स्तुतिसह आणि त्याच्याकडे मोक्षाकरिता प्रार्थना कर, नि:संशय तो पश्चाताप कबूल करणारा आहे.

सूरतुल इख़्लास

बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीम

१. कुल हुवल्लाहु अहद,

२. अल्लाहु स्समद

३. लम् यलिद व लम् यूलद,

४. व लम् यकुल्लहू कुफ़ुवन् अहद

अनुवाद

आरंभ करतो अल्लाहच्या नावाने जो सर्वाधिक कृपावंत सर्वाधिक दयावंत आहे.

१. सांगा तो अल्लाह एकच आहे,

२. अल्लाह निस्पृह आहे.

३. ना त्याच्यापासून कोणी जन्मला, ना तो कोणापासून जन्मला,

४. आणि कोणीही त्याच्या समान नाही.

सूरतुल फ़लक़

बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीम

१. कुल अऊज़ु बिरब्बिल् फ़लक़,

२. मिन् शर्रि मा ख़लक़,

३. व मिन् शर्रि ग़ासिक़ित इज़ा वक़ब्,

४. व मिन् शर्रिन्नफ़्फ़ासाति फ़िल् उक़द,

५. व मिन् शर्रि हासिदिन इज़ा हसद.

‘सूरतुल फ़लक़’ अनुवाद

आरंभ करतो अल्लाहच्या नावाने जो सर्वाधिक कृपावंत सर्वाधिक दयावंत आहे.

१. सांगा, मी शरण मागतो सकाळच्या स्वामीची,

२. त्या प्रत्येक वस्तूच्या अरिष्टापासून, जी त्याने निर्माण केली आहे,

३. आणि रात्रीच्या अंध:काराच्या अरिष्टापासून जेव्हा त्याचा अंधार पसरतो,

४. आणि गंड्यात फुंकणाऱ्याच्या अरिष्टापासून (सुद्धा)

५. आणि मत्सर करणाऱ्याच्या अरिष्टापासून जेव्हा तो मत्सर करतो.

सूरतुन्नास

बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीम

१. कुल अऊ़ज़ु बिरब्बिनासि,

२. मलिकिन्नासि, ३. इलाहिन्नासि,

४. मिन् शर्रिल् बस्वासिल् ख़न्नासि,

५. ल्लजी युवसविसु फ़ी सुदूरिन्नासि,

६. मिनल् जिन्नति वन्नास.

‘सूरतुन्नास’ अनुवाद

आरंभ करतो अल्लाहच्या नावाने जो सर्वाधिक कृपावंत सर्वाधिक दयावंत आहे.

१. सांगा मी शरण घेतो मानवाच्या पालनकर्त्याची,

२. मानवाच्या सर्वाधिपतीची,

३. मानवाच्या आराध्याची,

४. दुष्ट विचार भरविणाऱ्याच्या, मागे हटणाऱ्याच्या खोडीपासून,

५. जो लोकांच्या मनांत दुष्ट विचार भरवितो,

६. मग तो जिनमधून असो किंवा मानवामधून असो.

नमाजमधील उभ्या स्थितीत इतके पठण झाल्यानंतर ‘‘अल्लाहु अकबर’’ (अल्लाह सर्वश्रेष्ठ आहे) असे म्हणत वाकून गुडघ्यावर हात ठेवून ओणवे उभे राहिले जाते. त्या स्थितीत खालील शब्द उच्चारले जातात. (३, ५ किंवा ७ वेळा)

१. सुबहान रब्बियल अजीम (पवित्र आहे माझा श्रेष्ठ पालनकर्ता)

२. सुबहान रब्बियल अजीम (पवित्र आहे माझा श्रेष्ठ पालनकर्ता)

३. सुबहान रब्बियल अजीम (पवित्र आहे माझा श्रेष्ठ पालनकर्ता)

तदनंतर उभे राहत असताना म्हणतात :-

''समीअ अल्लाहु, लिमन हमिद''

(अल्लाहने त्याचे ऐकले ज्याने त्याची प्रशंसा केली)

मग सरळ उभे राहून म्हटले जाते,

''रब्बना लकल् हम्द''

(हे आमच्या पालनकर्त्या! सर्व प्रशंसा तुझ्यासाठीच आहेत),

नंतर पुन्हा ''अल्लाहु अकबर'' असा घोष करीत नमाज पढ़णारी व्यक्ती (नमाजी) त्याचे मस्तक जमिनीवर टेकवते.

या नतमस्तक अवस्थेला सज्दा म्हणतात. या अवस्थेत नमाजी आपले संपूर्ण अस्तित्व अल्लाहसमोर झोकून त्याचे गुणगान पुढील शब्द ३, ५ किंवा ७ वेळा उच्चारुन करतो.

१. ''सुबहान रब्बियल आला''

(पवित्र आहे माझा सर्वश्रेष्ठ पालनकर्ता)

२. ''सुबहान रब्बियल् आला''

(पवित्र आहे माझा सर्वश्रेष्ठ पालनकर्ता)

३. ''सुबहान रब्बियल् आला''

(पवित्र आहे माझा सर्वश्रेष्ठ पालनकर्ता)

नंतर ''अल्लाहु अकबर'' म्हणत जमिनीवरून मस्तक उचलून नमाजी सरळ बसतो. या बैठ्या अवस्थेत खालील प्रार्थना करतो -

''अल्लाहुम - मग़फ़िरली वरहमनी वहदिनी व आफ़िनी वर्ज़ुक्नी वजबुरनी वरफ़अनी''

अनुवाद

''हे माझ्या अल्लाह ! मला क्षमा कर आणि माझ्यावर दया कर आणि मला सन्मार्गावर ठेव आणि मला आरोग्यवान ठेव आणि मला उपजीविकेची शास्त्रसंमत उगम पुरव आणि माझ्यातील उणिवा दूर कर आणि माझे स्थान उच्च बनव.''

अशा तऱ्हेने आपला खरा पालनकर्ता, वास्तविक शासक आणि सर्वार्थाने खरा स्वामी असलेल्या अल्लाहच्या दरबारात याचना व प्रार्थना करत असतानाच 'अल्लाहु अकबर' म्हणत पुन्हा एकदा त्या खऱ्या अभिषिक्त सम्राटासमोर मस्तक दुसऱ्यांदा जमिनीवर टेकवून दुसरा सज्दा केला जातो आणि गुणगानपर खालील शब्द पुन्हा ३, ५ किंवा ७ वेळा उच्चारले जातात.

''सुबहान रब्बियल आला''

(पवित्र आहे माझा सर्वश्रेष्ठ पालनकर्ता)

दुसऱ्या सज्द्यानंतर, ''अल्लाहु अकबर'' म्हणत नमाजी बसतो आणि बसलेल्या स्थितीत खालील प्रार्थना करतो

तशहुद

१. अत्तहिय्यातु लिल्लाहि वस्सलवातु वत्तय्यिबातु अस्सलामु अ़लैक अय्युहन्नबिय्यु व रह़मतुल्लाहि व बरकातुहू,

२. अस्सलामु अलैना व अ़ला इबादिल्लाहिस्सालिहिन,

३. अशहदु अल् ला ऽऽ इलाह इल् लल्लाहु व अशहदु अन्न मुहम्मदन् अब्दुह व रसूलुह.

प्रार्थना 'तशहुद' अनुवाद

१. सर्व तऱ्हेच्या मौखिक, शारीरिक आणि आर्थिक आराधना अल्लाहसाठीच आहेत. हे प्रेषित तुम्हाला सुख, शांती सुरक्षा लाभो, अल्लाहची कृपा आणि समृद्धीही लाभोत.

२. सुख, शांती आणि सुरक्षेचा लाभ आम्हाला आणि अल्लाहच्या सदाचारी भक्तजनांना व्हावा.

३. मी साक्ष देतो की अल्लाहशिवाय अन्य कोणीही उपासनेस योग्य नाही. तसेच मी साक्ष देतो की प्रेषित मुहम्मद (त्याना शांती लाभो) हे अल्लाहचे भक्त आणि प्रेषित आहेत.

प्रार्थना ''दरूद''

१. अल्लाहुम्म स़ल्लि अ़ला मुहम्मदिंव व अ़लाऽऽ आलि मुहम्मदिन कमा सल्लैत अलाऽऽ इब्राहीम व अ़लाऽऽ आलि इब्राहीम इन्नक हमीदुम मजीद.

२. अल्लाहुम्म बारिक अ़ला मुहम्मदिंव व अलाऽऽ आलि मुहम्मदिन कमा बारक्त अ़लाऽऽ इब्राहीम व अ़लाऽऽ आलि इब्राहीम इन्नक हमीदुम मजीद.

प्रार्थना "दरूद" अनुवाद

१. हे अल्लाह ! तुझा कृपावर्षाव व्हावा, मुहम्मद (स) यांचेवर आणि मुहम्मद (स) यांच्या वंशजावर, जसा तू कृपावर्षाव केला आहेस इब्राहीम (अ) यांचेवर आणि इब्राहीम (अ) यांच्या वंशजावर, नि:संशय तू प्रसंशेस पात्र आणि महान आहेस.

२. हे अल्लाह ! तुझ्या देणग्यांची विपुलता व्हावी, मुहम्मद (स) यांचेवर आणि मुहम्मद (स) यांच्या वंशजावर, जशी तू तुझ्या देणग्यांची विपुलता केलीस इब्राहीम (अ) यांचेवर आणि इब्राहीम (अ) यांच्या वंशजावर, नि:संशय तू प्रसंशेस पात्र आणि महान आहेस.

ह्या प्रार्थनानंतर पवित्र कुरआन आणि पवित्र हदीस यामध्ये उल्लेख केलेली तोंडपाठ असलेली एखादी दुआ (प्रार्थना) केली जाते.

प्रार्थना आयत २०१ प. कुरआन/सुरह बकर,

"रब्बना आतिना फ़िदुनया हसनत व फ़िल आखिरति हसनंतर व क़िना अज़ाबन्नार"

प्रार्थना आयत २०१ अनुवाद

हे आमच्या पालनकर्त्या! या जगात, आम्हाला जे चांगले आहे ते दे आणि परलोकातसुद्धा आम्हाला जे चांगले आहे ते दे आणि नरकाग्नीच्या यातनांपासून आमचे संरक्षण कर.

या व अशा प्रार्थनानंतर, नमाजी आपले तोंड प्रथम उजवी व नंतर डावीकडे फिरवत खालील शब्द उच्चारतात (या क्रियेला "सलाम फेरना" असे म्हणतात)

अस्सलामु अलैकुम व रहमतुल्लाह (उजवीकडे)

अस्सलामु अलैकुम व रहमतुल्लाह (डावीकडे)

अनुवाद - (तुम्हाला सुख, शांती, सुरक्षा लाभो आणि अल्लाहची दया लाभो.)

सलाम फेरल्यानंतर नमाज ही उपासना पूर्ण होते.

सूर्यास्तानंतर साधारण दीड तासाने, त्या दिवसाची शेवटची (इशा नमाज) होते. तीमध्ये वरीलप्रमाणे सर्व प्रार्थना शिवाय झोपण्यापूर्वी पालनकर्त्या आणि अन्तर्यामी अल्लाहसमोर अतिशय नम्रतेने खालील शब्दांत एक प्रतिज्ञा केली जाते. या प्रतिज्ञेला किंवा प्रार्थनेला 'दुआ-ए-कुनूत' म्हणतात.

दुआ-ए-कुनूत

१. अल्लाहुम्म इन्ना नस्तईनुक व नस्तग़फ़िरूक व नुअमिनु बिक व नतवक्कलु अ़लैक व नुस्नी अ़लैकल ख़ैर व नशकुरुक व ला नक्‍फ़ुरुक व नख्लउ व नतूरूकु मंय यफ़जुरुक,

२. अल्लाहुम्म इय्याक नअ़बुदु व लक नुसल्ली व नसजुदु व इलैक नस्‌आ व नहफ़िदु व नरजू रहमतक व नख़्शा अजाबक,

३. इन्न अ़ज़ाबक बिलकुफ़्फ़ारि मुलहिक.

'दुआ-ए-कुनूत' अनुवाद

१. हे अल्लाह ! नि:संदेह आम्ही तुझी मदत मागतो आणि तुझ्याकडे मोक्षाची याचना करतो आणि तुझ्यावर श्रद्धा ठेवतो आणि तुझा भरवसा करतो आणि तुझी खूप चांगली प्रसंशा करतो आणि तुझे आभार मानतो आणि तुझ्याशी कृतघ्न होत नाही आणि जी व्यक्ती तुझी अवज्ञा करते तिच्याशी विभक्त होऊन त्याची संगत सोडून देतो.

२. हे अल्लाह ! आम्ही तुझी उपासना करतो आणि तुझ्यासाठीच नमाज अदा करतो आणि तुझ्यासमोर मस्तक टेकवतो आणि आम्ही तुझ्याचकडे धावत व त्वरेने येतो आणि तुझ्या दयेचे इच्छुक आहोत आणि तुझ्या शिक्षेला आम्ही घाबरतो.

३. खचितच तुझी शिक्षा तुला न मानणाऱ्याला होणार आहे.

समाप्त

आमची प्रकाशने

अ.क्र.	पुस्तक आणि लेखकाचे नाव	किंमत
78	**कुरआन सुरक्षित आहे** - डॉ. इल्तिफात अहमद	9
79	**हुतात्मा हजरत ईमाम हुसैन (र)** - मौ. अबुल आला मौदूदी	7
80	**इस्लाम संदेश (देशबांधवांसाठी)** - अबुजर कमालुद्दीन	9
81	**मुस्लिम कोणास म्हणतात ?**-मौ. अबुल आला मौदूदी	4
82	**इस्लाम आणि स्त्री**-मकबूल अहमद फलाही	7
83	**इस्लाममध्ये सक्तीचे धर्मांतर नाही** - अबू मुहम्मद इमामुद्दीन	10
84	**इस्लामी शासन : एक आदर्श**-अबू मुहम्मद इमामुद्दीन	20
85	**बलिदान (कुर्बानी)**- मौ. अबुल आला मौदूदी	3
86	**इतिहासावर हा अन्याय** - प्रो.बी.एन.पाण्डेय	6
87	**इस्लाम, मुस्लिम आणि देशबांधव**-यूसुफ करज़ावी	30
88	**बुरखा प्रगतिरोधक नाही** - परवीन रिझवी	4
89	**विश्वसमाज** - डॉ. इल्तिफात अहमद	7
90	**खरा तो एकचि धर्म** - सदरुद्दीन इसलाही	45
91	**अन्याय का ?**- मर्कजी मकतबा	6
92	**कुरआनच्या शीतल छायेत**-डॉ.एम.ए.जियाउर्रहमान	25
93	**जिहाद अल्लाहाच्या मार्गातील** - मौ. अबुल आला मौदूदी	8

IMPT

ISLAMIC MARATHI PUBLICATIONS TRUST
4, Hamid Building, 96, Hafiz Ali Bahadur Khan Marg,
Mominpura, Mumbai - 400 011.
Tel.: 2301 8387 • Cell: 9224599910

ISBN-81-87634-69